शासकीय पैशाची अफरातफर

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

परिपत्रक क्रमांक सीडीआर-११७२/९४१८/डी-एक,

सचिवालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ६ सप्टेंबर १९७२

परिपत्रक

शासनाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, शासकीय पैशाच्या अफरातफरीच्या बऱ्याचशा प्रकरणांमध्ये अफरातफरीस जबाबदार असणाऱ्या व्यक्तींकडून अफरातफर करण्यात आलेली रक्कम वसूल करण्याबाबत कारवाई करण्यास बराच विलंब होतो. कदाचित न्यायालयामध्ये अफरातफरीचा आरोप सिद्ध होईपर्यंत किंवा शिस्तभंगाची कार्यवाही पूर्ण करेपर्यंत वसुली तहकूब केल्याने हा विलंब होत असावा. अशा प्रकारची तहकुबी आवश्यक आहे किंवा काय याबाबत शासनाने विचार केला आहे आणि शासन असे निर्देशित करते की, अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये जर प्राथमिक चौकशीवरून असे सिद्ध होत असेल की, एका विशिष्ट व्यक्तीने पैशाची अफरातफर केली आहे तर प्रथम तिला पैसे परत करण्यास सांगण्यात यावे व तिच्याकडून वसुली करण्यात यावी. आवश्यक असेल तर व ती जर पैसे परत करण्यास तयार असेल तर तिच्या वेतनातून पैसे वजा करून वसूल करण्यात यावे. तथापि ती पैसे परत करण्यास तयार नसेल अशा परिस्थितीत वरील प्रकारची वसुली करता येणार नाही परंतु विभागीय कार्यवाही आणि/किंवा खटला भरण्याची नेहमीची पद्धती अंमलात आणावी. अशा प्रकारची कार्यवाही शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

म. के. गुप्ते,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

[मागे पहा

(शा.म.मु.) एच ५९ (२,५००--११-७२)

Misappropriation of Government money.

GOVERNMENT OF MAHARASHTRA

General Administration Department.

Circular No.CDR 1172/9418/D - I.

Sachivalaya, Bombay-32(BR), Dated the 6th September 1972.

CIRCULAR

It has been brought to the notice of Government that in a number of cases of misappropriation of Government money there is considerable delay in taking action to recover the misappropriated amount from those responsible for the misappropriation. Possibly, this delay is because the recovery is postponed until the charge of misappropriation is proved either in a Court of Law or after completing the disciplinary proceedings. Government has considered whether such postponement is necessary and is pleased to direct that, in such cases, if the preliminary investigation establishes that a particular person has misappropriated the money, the person should, in the first instance, be called upon to pay the amount and the amount should be recovered from him, if necessary, by deduction from his pay, if he agrees to refund the amount. In case, however, he does not agree to refund the amount, no such recovery can be made but the usual procedure of departmental action and/or prosecution should be followed. Care should be taken to see that such proceedings are finalised as expeditiously as possible.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M.K. GUPTE,
Under Secretary to the Government of Maharashtra.

P.T.O.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
सर्व सचिवालयीन विभाग,
प्रबंधक, मूळ न्यायशाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राद्वारे),
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राद्वारे),
सर्व विभागीय प्रमुख व सचिवालयीन विभागाखालील सर्व कार्यप्रमुख,
महालेखाकार, महाराष्ट्र, मुंबई,
अपर महालेखाकार, नागपूर शाखा, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.

क्रमांक   १९७

माहिती व मार्गदर्शनासाठी प्रत अग्रेषित.

To

The Secretary to the Governor,
The Secretary to the Chief Minister,
The Secretary, Maharashtra Public Service Commission, Bombay,
The Secretary, Maharashtra Legislature Secretariat, Council Hall, Bombay,
All Departments of the Secretariat,
The Prothonotary and Senior Master, High Court, Original Side, Bombay (By letter),
The Registrar, High Court, Appellate Side, Bombay (By letter),
All Heads of Departments and Heads of Offices under several Departments of the Secretariat,
The Accountant General, Maharashtra, Bombay,
The Additional Accountant General, Nagpur Branch, Nagpur,
The Pay and Accounts Officer, Bombay,
The Resident Audit Officer, Bombay,

No.   of 1972.

Copy forwarded for information and guidance to –